# भारतातील सार्वजनिक आयव्यय

# सार्वजनिक आयव्यय

**व्याख्या:**

**प्रा. डाल्टन यांच्या मते,** सार्वजनिक आयव्यय हा अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या शास्त्रांच्या सीमांवरील अनेक विषयांपैकी एक विषय असून, या विषयाचा संबंध सार्वजनिक संस्थाच्या उत्पन्नाशी आणि खर्चाशी मेळ घातला जाण्याशी असतो.

**आर्मि टेज स्मिथ यांच्या मते,**

सरकारी महसूल आणि खर्च यांचे स्वरूप आणि तत्वे यांचे अन्वेषण यालाच सार्वजनिक आयव्यय असे म्हणतात.

फिंडले शिराज यांच्या मते, सार्वजनिक सत्तांच्या उत्पन्न मिळवण्याच्या व खर्च करण्याच्या पध्दतींशी ज्यांचा संबंध आहे त्या शास्त्राला सार्वजनिक आयव्यय म्हणतात.

## स्वरुप :

निसर्गवादी, व्यापारवादी ॲडम स्मिथ, जे.बी.से,, रिकार्डो, मिल, यांनी व्यक्तिस्वातंत्र्य आणि निर्हस्तक्षेप धोरण स्विकारलेले असल्याने सार्वजनिक आयव्ययाचे स्वरुप संकुचित झाले आहे. अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या दोहोंशी संबंधित सार्वजनिक आयव्यय हा विषय असल्याने त्यामुळे सरकारने उत्पन्न कसे मिळवावे व खर्च कसे करावे या दोहोंमध्ये मेळ घेतला जातो. सरकारने सुरक्षितता आणि संरक्षण, आणि शांतता या कार्यांबरोबरच जनहिताची कामे केली पाहिजेत. तसेच राज्यात कल्याणकारी राज्याची संकल्पना यशस्वीपणे राबवण्यात आली पाहिजे.

## सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती :

१. सार्वजनिक उत्पन्न
२. सार्वजनिक खर्च
३. सार्वजनिक कर्ज
४. वित्तीय प्रशासन
५. संघीय वित्तपुरवठा
६. राज्य वित्तीय धोरण

## सार्वजनिक आयव्ययाचे महत्व :

१. युध्दखर्च भागविण्यासाठी

२. कार्यक्षम राज्यकारभारासाठी

३. आर्थिक स्थैर्य

४. प्रभावी मागणी वाढवण्यासाठी

५. खाजगी गुंतवणूक वाढवण्यासाठी

६. पूरक सुविधांचा विकास

७. उपलब्ध नैसर्गिक सुविधांचा वापर

८. आर्थिक विकास

९. आर्थिक समानता

१०. आर्थिक कल्याण

| खाजगी आयव्यय | सार्वजनिक आयव्यय |
|---|---|
| १. खाजगी आयव्ययाचे उद्दिष्ट व्यक्तीचे महत्तम कल्याण हे असते. | १. सार्वजनिक आयव्ययाचे उद्दिष्ट संपूर्ण समाजाचे कल्याण हे असते. |
| २. खासगी आयव्ययाचे उद्दिष्ट व क्षेत्र संकुचित असते. | २. सार्वजनिक आयव्ययाचे उद्दिष्ट व क्षेत्र व्यापक |
| ३. व्यक्तीच्या उत्पन्नाची साधने मर्यादित असतात. | ३. सरकारच्या उत्पन्नाची अनेक साधने असतात. |
| ४. व्यक्तीची उत्पन्न मिळवण्याची शक्ती मर्यादित असते. | ४. सरकारची उत्पन्न मिळवण्याची शक्ती अमर्याद असते. |
| ५. व्यक्तीच्या बाबतीत खर्च अधिक लवचिक असतो. | ५. सरकारच्या बाबतीत उत्पन्न अधिक लवचिक असते. |
| ६. खासगी व्यक्ती सक्ती करुन उत्पन्न मिळवू शकत नाही. | ६. कर देणे हे सक्तीचे असल्याने त्यापासून सरकारला उत्पन्न मिळते |
| ७. व्यक्ती व खासगी उद्योगसंस्थांना उत्पन्न मिळवण्यासाठी अधिकाराचा वापर करता येत नाही. | ७. सरकार करापासून उत्पन्न मिळवतांना अधिकाराचा वापर करते |
| ८. व्यक्तिगत खर्च टाळता येण्यासारखा किंवा पुढे ढकलता येतो. | ८. सरकारी खर्च अनिवार्य असतात. |
| ९. व्यक्ति फायद्यासाठी खर्च करते. | ९. सरकारचा नफा मिळवणे हा हेतू नसतो. |
| १०. व्यक्तिगत खर्चावर सामाजिक चालीरीती, रीतिरिवाज, प्रथा , सांस्कृतिक व इतर सामाजिक रुढी व मूल्ये यांचा प्रभाव पडतो. | १०. सार्वजनिक खर्च हा हेतूपूर्वक आखलेल्या वित्तीय धोरणाने नियंत्रित केलेला असतो. |
| ११. व्यक्ती आपले अंदाजपत्रक तयार करतांना उत्पन्नापेक्षा खर्च कमी करण्याचा प्रयत्न करते. | ११. सरकारला जमेपेक्षा खर्चाचा जास्त विचार करावा लागतो. |
| १२. व्यक्तीच्या बाबतीत अंदाजपत्रक हे आठवडयाचे, महिन्याचे अथवा वर्षाचे सुध्दा असू शकते. | १२. सरकारच्या बाबतीत एका वर्षाचा विचार केला जातो. |
| १३. व्यक्ति भविष्यकाळापेक्षा वर्तमानकाळाचा व अल्पकाळाचा विचार करते. | १३. सरकार वर्तमानकाळाबरोबर भविष्यकाळाचाही विचार करते. |
| १४. व्यक्ति आपले उत्पन्न,खर्च व कर्ज याबाबतीत गुप्तता बाळगते. | १४. सरकार आपले उत्पन्न व खर्चाबाबतचे अंदाजपत्रक जनतेसमोर मांडते. |
| १५. खाजगी संस्था अथवा व्यक्ती बँका, सावकार यांच्याकडून कर्ज घेते. | १५. सरकार देशातील जनतेकडून अथवा विदेशातून कर्ज उभारु शकते. |

# महत्तम सामाजिक हिताचे (लाभाचे) तत्व : डॉ. डाल्टन यांचा दृष्टीकोन

**डॉ. डाल्टन यांच्या मते,**


जिच्या कार्यापासून महत्तम सामाजिक हित साधले जाते ती सार्वजनिक आयव्ययाची सर्वोत्तम पध्दती होय. घटत्या सीमांत उपयोगिता नियमाचा आधार डॉ. डाल्टन यांनी घेतला आहे. हा नियम सार्वजनिक उत्पन्न व खर्च या दोन्ही बाजूंना स्वतंत्ररीत्या लागू करता येतो.

**सार्वजनिक उत्पन्न :** सरकार कर रुपाने समाजाकडून अधिकाधिक पैसा जमा करील तसतसा समाजाचा पैशाचा त्याग वाढत जाईल. महत्तम सामाजिक हिताच्या तत्वानुसार कर आकरणीमुळे समाजाला कराव लागणारा सीमांत त्याग न्यूनतम राहीला पाहिजे.

**सार्वजनिक खर्च :** सरकारने आपल्या विविध बाबींवर अशा रीतीने खर्च करावा की, जेणेकरुन त्यांचा सीमांत लाभ समान होईल. त्यामुळे एकूण लाभ महत्तम होईल.

**उत्पन्न आणि खर्चाचा समतोल :**

ज्या बिंदूला ज्या एकूण आयव्ययासाठी करावा लागलेला सीमांत त्याग आणि समाजाला मिळालेला सीमांत लाभ समान होतात, तेथे समाजाचे हित महत्तम होते. हीच सार्वजनिक आयव्ययाची युक्त पातळी व मर्यादा होय.




डॉ. डाल्टन यांनी महत्तम सामाजिक हिताचे तत्व अथवा सिध्दांत पुढील शब्दात मांडला.

ज्यामुळे प्रत्येक बाबीवर केलेल्या खर्चाचा सीमांत सामाजिक लाभ सार्वजनिक उत्पन्नाच्या प्रत्येक बाबींच्या सीमांत सामाजिक त्यागाइतका तंतोतंत होतो त्या मर्यादेइतकाच सार्वजनिक खर्च केला पाहिजे.

## महत्तम सामाजिक हिताचे निकषः

डॉ. डाल्टन यांनी पुढील निकष सुचविले आहे.

१. समाजाचे संरक्षण

२. उत्पादनात सुधारणा

- अ. उत्पादन क्षमतेत वाढ
- ब. उत्पादन संघटनेत सुधारणा
- क. उत्पादन रचनेत सुधारणा

३. संपत्तीच्या वितरणात सुधारणा

- अ. विषमतेत घट
- ब. उत्पन्नातील उच्चावचने कमी करणे

४. आर्थिक स्थैर्य आणि पूर्ण रोजगार

५. भविष्याची तरतूद

## मर्यादा आणि अडचणी :

१. अव्यवहार्य

२. समाजहिताची कल्पना अस्थिर

३. संवेदनक्षम मनाचा अभाव

४. सीमांत लाभ व सीमांत त्याग यांचा अचूक समसंबंध स्थापन करणे कठीण

५. सार्वजनिक खर्चातील वाढीला आपोआप आळा बसणे शक्य नसते

६. सार्वजनिक खर्चाच्या बाबतीत मतभेद

## प्रकरण दूसरे

# सार्वजनिक खर्च

# सार्वजनिक खर्च

सार्वजनिक सत्ता अथवा सरकारकडून नागरिकांच्या सामूहिक गरजांच्या पुर्तीसाठी किंवा त्यांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणात सुधारणा करण्यासाठी जो खर्च केला जातो त्याला सार्वजनिक खर्च म्हणतात.

सार्वजनिक सत्तेकडून स्वत:च्या शासकीय आणि इतर व्यवहारांसाठी केला जाणारा खर्च आणि समाज व अर्थव्यवस्था यासाठी करावा लागणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

जो खर्च एकूण लोकांच्या हितांचा विचार करुन केला जातो. त्यास सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

# सार्वजनिक खर्चाचे वर्गीकरण :

१. लाभ तत्वानुसार वर्गीकरण
२. उत्पन्न तत्वानुसार वर्गीकरण
३. कार्यतत्वानुसार वर्गीकरण
४. निकडीच्या तत्वनुसार वर्गीकरण
५. आवश्यकतेच्या तत्वानुसार वर्गीकरण
६. तुलनात्मक महत्वानुसार वर्गीकरण
७. अनुदाने व मूल्यतत्वानुसार वर्गीकरण
८. हस्तांतरणीयतेचे तत्व
९. स्थिर व बदलता खर्च
१०. उत्पन्नाच्या आधारावर वर्गीकरण
११. आर्थिक वर्गीकरण

## सार्वजनिक खर्चाची तत्वे :

१. महत्तम सामाजिक लाभ

२. मितव्ययता

३. मान्यता

४. वाढावा

५. लवचिकता

६. उत्पादकता

७. समान वितरण

८. समन्वय

९. सोय

# सार्वजनिक खर्चाची प्रवृत्ती
## केंद्र सरकारचा खर्च
## (रु. कोटी)

| वर्ष | महसुली खर्च | भांडवली खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ३५० | १८० | ५३० |
| १९८०-८१ | १४५४० | ९६३० | २४१७० |
| २००१-०२ | ३०१६१० | ६०८४० | ३६२४५० |
| २००५-०६ अंदाज | ४४६५२० | ६७८३० | २१४३५० |
| २००९ अंदाज | ८९७२३२ | १२३६०६ | १०२०८३८ |

## सरकारी खर्चात वाढ होण्याची कारणे :

१. लोकसंख्येतील वाढ व वाढते नागरीकरण
२. कल्याणकारी राज्याची कल्पना
३. लोकशाही प्रवृत्तीत वाढ
४. औद्योगिकीकरण
५. उद्योगांचे व सेवांचे राष्ट्रीयीकरण
६. विकास व नियोजन
७. किंमतीतील वाढ
८. संरक्षण खर्चात वाढ
९. मुलकी प्रशासन खर्च
१०. सरकारकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाता बदल

## सार्वजनिक खर्चाचे परिणाम :

१. सार्वजनिक खर्चाचे उत्पादनावरील परिणाम

अ. काम, बचत आणि गुंतवणूक करण्याच्या शक्तीवरील परिणाम

ब. काम, बचत आणि गुंतवणूक करण्याच्या इच्छेवरील परिणाम

क. साधनसामग्रीच्या स्थानांतरणावरील परिणाम

२. सार्वजनिक खर्चाचे विभाजनावरील परिणाम

३. सार्वजनिक खर्चाचे रोजगारावरील परिणाम

४. आर्थिक स्थैर्यावरील सार्वजनिक खर्चाचे परिणाम

५. सार्वजनिक खर्चाचे आर्थिक विकासावरील परिणाम

# प्रकरण तिसरे

# सार्वजानिक महसूल (उत्पन्न)

सार्वजनिक उत्पन्न किंवा महसूल म्हणजे सरकारला विविध मार्गांनी प्राप्त होणारे एकूण उत्पन्न होय.

**सार्वजनिक महसूलाचे स्त्रोत :**

१. शुल्क

२. दंड

३. व्यावसायिक/ वाणिज्य उत्पन्न

४. अनुदाने

५. देणग्या

६. कर

# कर

कर हा व्यक्तीकडून सक्तीने घेतला जातो व तो सर्वांच्या हितासाठी खर्च केला जातो आणि वैयक्तिक लाभाशी त्याचा काहीही संबंध नाही. - सेलिगमन

कर म्हणजे व्यक्तीने वा संस्थेने स्वतःच्या संपत्तीचा सार्वजनिक सत्तेच्या सेवेसाठी दिलेला सक्तीचा भाग होय. - बॅस्टबल

कर म्हणजे राज्यांसाठी नागरिकांनी केलेले अंशदान होय. - ॲडम स्मिथ

थोडक्यात जनतेच्या कल्याणासाठी शासनाला करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी शासनाने लोकांकडून सक्तीने घेतलेली रक्कम म्हणजे कर होय.

## कर आकारणीची उद्दिष्ट्ये :

१. उत्पन्न प्राप्ती

२. उत्पन्न वाटपातील विषमता कमी करणे

३. अनावश्यक उपभोग कमी करणे

४. आयात-निर्यातीस मदत

५. भाववाढ रोखणे

६. राष्ट्रीय उत्पन्न पातळी ऊंचावणे

| कराघात : | करभार: | करसंक्रमण : |
|---|---|---|
| सरकारने आकारलेला कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी ज्या व्यक्तीवर येऊन पडते त्या व्यक्तीवर कराघात होतो. जी व्यक्ती कायद्याने कर भरण्यास जबाबदार असते ती व्यक्ती आपल्यावर आकारलेला कर स्वतः न भरता ब-याच वेळा इतरांकडून वसूल करीत असते, तर काही वेळा तो कर स्वतःलाच भरावा लागतो. | सरकारने आकारलेल्या कराचे द्रव्यरुप ओझे (भार) शेवटी कोणावर पडते हे सांगणे म्हणजे करभार होय. करभार ज्या व्यक्तीला शेवटी कराचा बोजा सहन करावा लागतो त्या व्यक्तीवर पडतो म्हणून करभार म्हणजे कर ज्या ठिकाणी स्थिरावतो ती जागा होय. | कायद्यानुसार कर भरण्यास जबाबदार असणारी व्यक्ती कर स्वतः न भरता कराची रक्कम इतरांकडून वसूल करते, तेंव्हा कराचे एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीकडे संक्रमण होते म्हणून त्यास करसंक्रमण असे म्हणतात. एका व्यक्तीकडून दुस-या व्यक्तीकडे कर ढकलण्याच क्रियेला करसंक्रमण म्हणतात. |

## करदेय क्षमता :

अर्थव्यवस्थेत फार मोठे बदल न होता आणि लोकांना दु:खी व पददलित जीवन जगावे न लागता, एखाद्या देशाचे नागरिक राजसत्तेला आपल्या योगदानाच्या स्वरुपात जी जास्तीत जास्त रक्कम सहजपणे देऊ शकतात, ती त्या देशाची करभार पात्रता होय.- **लॉर्ड स्टँप**

राहणीमान कायम ठेवून आणि उत्पादन क्षमता कायम ठेवण्यासाठी जो किमान उपभोग आवश्यक असतो त्या मर्यादेपलीकडे उत्पादनाचे आधिक्य म्हणजे करदेय क्षमता होय. - **प्रा. फिंडले शिरास**

# भारतीय कररचना

## भारतीय करांचे वर्गीकरण :

### १. केंद्र सरकारचे कर

अ. केंद्र सरकारा प्रत्यक्ष कर

a.वैयक्तिक प्राप्तीकर
b.महामंडळ कर
c.व्याजावरील कर
d.खर्चावरील कर
e.संपत्ती कर
f.संपदा शुल्क
g.देणगी कर

ब. केंद्रसरकारचा अप्रत्यक्ष कर/ वस्तूंवरील व सेवांवरील कर

a.केंद्रीय उत्पादन शुल्क
b.जकाती / आयात-निर्यात कर
c.सेवाकर

### २.राज्य सरकारांचे कर

१. केंद्रीय करातील राज्यांचा हिस्सा
२. प्राप्तीवरील राज्य सरकारचा कर
३. मालमत्तेवरील कर
४. विक्रीकर
५. राज्य उत्पादन शुल्क
६. मूल्यवर्धीत कर

## भारतीय करपध्दतीची वैशिष्टये :

१. संघीय करपध्दती

२. कर महसुलात प्रचंड वाढ

३.अप्रत्यक्ष कराला अधिक महत्व

४. प्रतिगामी करपध्दती

५. प्रत्यक्ष कराचा मर्यादित पाया

६. कृषी उत्पन्नावर कर नाही

७. कर चुकविण्यास मोठा वाव

८. अपुरेपणा

९. कमी लवचीकता

१०. भांडवल प्रधान तंत्राला उत्तेजन देणारी

११. बचतीवर प्रतिकूल परिणाम

१२. आर्थिक विषमतेत वाढ

१३. निगम कराचे उच्च दर

## भारतीय करपध्दतीचे दोष :

१. अपुरेपणा

२. एकांगी

३. कर चुकविण्यास वाव

४. लवचिकतेचा अभाव

५. बचतीला मारक

६. आर्थिक विषमतेत वाढ

७. भाववाढीस कारणीभूत

## प्रकरण चौथे

# सार्वजनिक कर्ज

सरकारने सार्वजनिक खर्चाकरीता देशातील लोकांकडून व परकीय देशांकडून घेतले कर्ज म्हणजे सार्वजनिक कर्ज होय.

केंद्र सरकार स्वदेशातून किंवा परकीय देशांकडून जे कर्ज घेते ते सार्वजनिक कर्ज होय- प्रा. फिंडले शिरास

सार्वजनिक सत्तेच्या उत्पन्नाचे एक साधन म्हणजे सार्वजनिक कर्ज होय- डॉ. डाल्टन

## सार्वजनिक कर्जाचे प्रकार :

१. अंतर्गत आणि बाहय कर्ज

२. उत्पादक आणि अनुत्पादक कर्ज

३. ऐच्छिक कर्जे व सक्तीची कर्जे

४. निधिक कर्जे व अनिधिक कर्जे

५. शोध्य कर्जे व अशोध्य कर्जे

# अंतर्गत कर्ज आणि बाहय कर्ज

| अंतर्गत कर्जाचे मार्ग | बाहय कर्ज उभारणीचे मार्ग |
| --- | --- |
| १. देशातील नागरीक<br>२. व्यापारी बँका<br>३. बँकेत्तर वित्तीय संस्था<br>४. मध्यवर्ती बँक | १. परकीय नागरीक<br>२. परकीय सरकार<br>३. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था |

## सार्वजनिक कर्जाचे परिणाम

१. उपभोगावरील परिणाम
२. उत्पादनावरील परिणाम
३. विभाजनावरील परिणाम
४. खाजगी क्षेत्राातील परिणाम
५. उत्पन्न व रोजगारपातळीवरील परिणाम
६. बाहय कर्जाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम

## सार्वजनिक कर्जफेडीच्या पध्दती :

१. कर्ज परिवर्तन

२. कर्ज खरेदी

३. भांडवल कर

४. कर्जफेड निधी

५. वर्षासने

६. अंदाजपत्रकातील शिल्लक रक्कम वापरणे

७. करांचे प्रमाण वाढविणे

८. क्रमानुसार कर्जफेड

९. कर्जाचे पुनर्शोधन

१०. कर्जफेडीस नकार देणे किंवा कर्जनिषेध

११. तुटीचा अर्थभरणा

१२. व्याजाचे दर कमी करणे

## प्रकरण पाचवे

# अंदाजपत्रक

निश्चित काळासाठी खर्च आणि जमा यांचे संतुलन विवरणपत्र म्हणजे अर्थसंकल्प की, जे प्रशासनाच्या अधिकारामध्ये असते. ज्यामध्ये मागील कामगिरीचा आढावा असतो. चालू घडामोडींवर नियंत्रणाच्या पध्दती असतात. भविष्यकालीन योजनांचे अंदाज वर्तवलेले असतात. - प्रा. डिमॉक

अंदाजपत्रक म्हणजे शासनाच्या खर्चाचा आणि महसुलाचा पुढील वर्षाचा अंदाज होय. - जे. एल. हॅन्सन

अंदाजपत्रक म्हणजे खर्च आणि उत्पन्न या दोन्हीतील समतोल निर्माण केला जातो अशी वित्तीय योजना होय. - सी.एल. किंग

# महसुली अंदाजपत्रक

महसुली अंदाजपत्रकात सरकारचे महसुली उत्पन्न आणि चालू किंवा महसुली खर्चाचा समावेश होतो. केंद्र सरकारला मिळणा-या महसुली उत्पन्नाची कर उत्पन्न व करेतेर उत्पन्न अशी विभागणी केली जाते. केंद्र सरकारला वैयक्तिक उत्पन्न कर, महामंडळ कर, खर्च कर, संपत्ती व मालमत्तेवरील कर इ. प्रत्यक्ष करांबरोबरच केंद्रीय उत्पादन करा, जकाती, सेवाकर, इ. अप्रत्यक्ष करांपासूनही उत्पन्न मिळते. तसेच व्याजापासून मिळणारे उत्पन्न, लाभांश, वित्तीय सेवा, आर्थिक सेवा, सर्वसामान्य सेवा, सामाजिक व इतर सेवा यांच्यापासून मिळणा-या उत्पन्नाबरोबरच परकीय राष्ट्रे व आतंरराष्ट्रीय वित्त संस्थाकडून मिळणा-या देणग्यांचाही करेत्तर उत्पन्नात समावेश होतो.

भारत सरकारच्या महसुली खर्चाची विभागणी विकास खर्च व विकासेत्तर खर्च अशी केली जाते. विकास खर्चात सामाजिक सेवा, सर्वसामान्य सेवा, अनुदाने इ.चा समावेश होतो. तर विकासेत्तर खर्चात व्याज, व्यवस्थापन सेवा, हिशेबतपासणी, संरक्षण, विकासेतर अनुदाने इ.समावेश होतो.

# भांडवली अंदाजपत्रक

भांडवली खात्यावरच्या जमा-खर्चाला भांडवली अंदाजप ाक म्हणतात.

भांडवली जमा खात्यात सरकारने बाजारातून घेतलेली कर्जे, रिझर्व्ह बँ, परकीय सरकारे, संस्था यांच्या कडून घेतलेली कर्जे आणि इतर राज्ये व केंद्रशासीत प्रदेश यांना वेळोवेळी दिलेल्या कर्जांची परतफेड म्हणून मिळणा-या रकमा इ. समावेश होतो.

भांडवली खर्चात विविध मालमत्ता व विविध गुंतवणूका समाविष्ट केल्या जातात. देशात उत्पादक व विकासात्मक संपत्ती निर्माण करण्यावर केला जाणारा खर्च म्हणजे भांडवली खर्च होय.

## शिलकीचे अंदाजपत्रक

खर्चापेक्षा उत्पन्न अधिक असेल त्यास शिलकी अंदाजपत्रकअसे म्हणतात. सरकारचे वार्षिक उत्पन्न वार्षिक खर्चापेक्षा अधिक असेल तर अंदाजपत्रकात शिल्लक राहते. थोडक्यात, अंदाजपत्रकात सरकारचे एकूण अपेक्षित उत्पन्न जास्त व एकूण अपेक्षित खर्च कमी असतो.

## तुटीचे अंदाजपत्रक

उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असेल तर त्यास तुटीचे अंदाजपत्रक म्हंटले जाते. जेंव्हा अंदाजपत्रकात सरकारचे एकूण उत्पन्न कमी व एकूण खर्च जास्त असतो तेंव्हा त्यास तुटीचे अंदाजपत्रक म्हणतात. देशातील एकूण खर्च आवश्यकतेपेक्षा कमी असेल व तो वाढवायचा असेल तर सरकार तुटीच्या अंदाजपत्रकाचे धोरण अवलंबविते.

## समतोल अंदाजपत्रक

ज्या अंदाजपत्रक उत्पन्न आणि खर्च समान असतात, अश्या अंदाजपत्रकाला समतोल अंदाजपत्रक म्हणतात. समतोल अंदाजपत्रक धोरण देशाच्या आर्थिक स्थैर्यावर अथवा आर्थिक उलाढालींवर परिणाम घडून आणण्याबाबत तटस्थ असते.

## भारताच्या केंद्रिय अंदाजपत्रकाची आखणी आणि सादरीकरण :

भारताचे अंदाजपत्रकीय  वर्ष एक एप्रिलपासून सुरु होऊन एकतीस मार्चला संपते. फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी अर्थमंत्री संसदेत अंदाजपत्रक सादर करतात. अंदाजपत्रकीय भाषण दोन भागात विभागलेले असते. A भागात गतवर्षीच्या अंदाजपत्रकाचा आढावा घेतला जातो. B भागात पुढील वर्षाच्या खर्चाचा समावेश केला जातो.

१. अंदाजपत्रकाची मांडणी
२. अंदाजपत्रकाची आखणी
३. अंदाजपत्रकाचे सादरीकरण
४. अंदाजपत्रकाची मंजुरी

## अंदाजपत्रकातील तुटीच्या संकल्पना :

### १. महसुली तूट :

एकूण महसुली खर्चातून एकूण महसुली उत्पन्न वजा जाता जी शिल्लक राहते त्यास महसुली तुट म्हणतात.

महसुली तुट = एकूण महसुली खर्च - एकूण महसुली जमा

महसुली तुट= (प्रशासन खर्च+सरकारी कर्जावरील व्याज+ सबसिडी+ आर्थिक व सामाजिक सेवांवरील खर्च ) - (कर + करेत्तर उत्पन्न )

### २. वित्तीय तूट :

वित्तीय तूट अथवा राजकोषीय तूट = एकूण खर्च - (महसुली उत्पन्न + कर्जाची वसुली अथवा भांडवली उत्पन्नातील फक्त कर्जाची परतफेड + इतर उत्पन्न)

एकूण वित्तीय तूट = एकूण खर्च - (महसुली उत्पन्न + कर्जवसुली + इतर उत्पन्न)

निव्वळ वित्तीय तूट = एकूण वित्तीय तूट - निव्वळ देशांतर्गत कर्जे

### ३. प्राथमिक तूट :

प्राथमिक तूट = राज्यवित्तीय तूट - व्याज

एकूण प्राथमिक तूट= एकूण वित्तीय तूट - व्याजापोटी द्यावयाच्या निव्वळ रकमा

निव्वळ प्राथमिक तूट = निव्वळ वित्तीय तूट - व्याजासाठी द्यावयाच्या निव्वळ रकमा

# लिंगाधिष्टित अंदाजपत्रक / जेंडर बजेट

या बजेटची संकल्पना सर्वप्रथम आस्ट्रेलिया या देशात स्विकारण्यात आली. अर्थसंकल्पनेत जेंव्हा महिलांसाठी स्वतंत्र वित्तीय तरतुदी केल्या जातात तेव्हा त्यास जेंडर बजेट म्हणतात. २००६-०७ पासून स्त्रिया व लहान मुले यांच्यासाठी काय करता येईल त्यासाठी तरतुदी केलेल्या आहेत ते स्पष्ट करण्यासाठी जेंडर बजेट ची स्वतंत्रं कागदपत्रे, अर्थसंकल्पना सोबत सादर केली जातात.

प्रकरण सहावे

# तुटीचा अर्थभरणा

विकसित देशात तुटीचा अर्थभरणा म्हणजे सरकारच्या एकूण महसुली उत्पन्नापेक्षा महसुली खर्च व भांडवली खर्चाचे प्रमाण अधिक असते, तेंव्हा तुटीचा अर्थसंकल्प अस्तित्वात येतो व ही तूट भरुन काढणे हे होय. ही तूट सरकारने जनतेकडून आणि व्यापारी बँकाकडून कर्ज घेऊन भरुन काढली त्यास तुटीचा अर्थभरणा म्हंटले जाते.

भारत सरकार तुटीच्या अर्थभरण्याचा उपयोग निधी उभारुन आर्थिक विकासासाठी केला जातो. जेंव्हा सरकारला विकास कामांसाठी खर्च करण्याला कर या साधनां´ारे उत्पन्न कमी पडते, तेंव्हा संचयित रोख शिल्लक रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून उपलब्ध केली जाते. तसेच बाजारातून कर्ज उभारणे इ.

जेंव्हा सरकारचा चालू महसूल आणि व्यापारी बँका व खासगी व्यक्ती यांच्याकडून घेतलेली कर्जे या दोहोंच्या बेरजेपेक्षा सरकारचा एकूण खर्च जेंव्हा अधिक असतो त्याला तुटीचा अर्थभरणा असे म्हंटले जाते.

## तुटीच्या अर्थभरणयाची उद्दिष्टये :

१. युध्दकालीन अधिकचा खर्च भागविणे
२. आर्थिक मंदी नियंत्रित करणे
३. गुंतवणुकीतील कमतरता भरुन काढणे
४. उत्पादन साधनांचा अधिकधिक वापर करणे
५. रोजगारवाढ
६. आर्थिक विकास
७. दारिद्र्यनिर्मूलन
८. पुरवठयातील वाढ

## तुटीच्या अर्थभरण्याची कारणे :

१. युध्दासाठी प्रचंड खर्च करणे

२. प्रभावी मागणीची कमतरता

३. तीव्र भांडवल टंचाई

४. जागतिक घसरण

५. आर्थिक विकासाचे कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी

६. अतिरिक्त क्षमतेचा वापर

७. भाववाढ

८. इतर कारणे

# १९९१ पासूनचा तुटीचा अर्थभरणा

| वर्ष | एकूण वित्तीय तूट (कोटी रु.) |
| --- | --- |
| १९९०-९१ | ४४६५० |
| १९९७-९८ | ८८९३७ |
| २०००-०१ | ११८८१६ |
| २००५-०६ | १४६४३५ |
| २००९-१०(E) | ४००९९६ |
| २०१०-११(E) | ३८१४०४ |

# तुटीच्या अर्थभरण्याचे परिणाम

| अनुकूल परिणाम | प्रतिकूल परिणाम |
|---|---|
| १. आर्थिक विकास | १. कर्जबाजारीपणात वाढ |
| २. रोजगारात वाढ | २. सरकारवरील व्याजाच्या भारात वाढ |
| ३. दारिद्र्य निर्मुलन | ३. भाववाढ |
| ४. पुरवठयातील वाढ | ४. उपभोगात घट |
| ५. संरक्षण सिध्दता | ५. गुंतवणुकीच्या संरचनेत अनिष्ठ बदल |
| | ६. साठेबाजी |
| | ७. पतनिर्मितीत वाढ |
| | ८. खासगी गुंतवणुकीत घट |

# प्रकरण सातवे

# केंद्र-राज्य वित्तीय संबंध

# संविधात्मक तरतुदी

भारतीय संविधानानुसार कार्याचे वाटप केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमध्ये करतांना त्रिसूत्री करण्यात आली आहे. त्यानुसार

१. केंद्रसरकारकडे संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, विमान व जहाज वाहतूक, चलननिर्मिती, तार व दूरध्वनी इ. महत्वाची कामे सोपविण्यात आली आहेत.

२. राज्य सरकारकडे कृषी, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, सामाजिक व्यवस्था, पाणीपुरवठा इ. कार्ये सोपविण्यात आली आहेत.

संविधानाच्या २४६ व्या सातव्या सूचीमध्ये केंद्रसरकारला पुढील करांपासून उत्पन्न मिळते:

वैयक्तिक प्राप्तीकर, महामंडळ कर, आयात-निर्यात कर, केद्रीय उत्पादन शुल्क, कुषी मालमत्ता वगळून इतर मालमत्तेवरील कर, मुद्रांक शुल्क, वर्तमानपं ाावरील कर,रेल्वे वाहतूक, प्रवास भाडे कर, इ.

संविधानाच्या २४६ व्या सातव्या सूचीमध्ये राज्य सरकारला पुढील करांपासून उत्पन्न मिळते:

जमीन महसुल, खरेदी-विक्रीवरील कर, कृषी उत्पन्नवरील कर, कृषी मालमत्तावरील कर, मादक द्रव्यांवरील उत्पादनशुल्क, विजेच्या वापरावरील कर, करमणू कर, व्यवसाय कर इ.

नोव्हेंबर २००२ मध्ये डॉ.सी.रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची नियुक्ती करण्यात आली. या आयोगाच्या शिफारशी २००५-१० या कालावधीसाठी लागू करण्यात आलेल्या आहेत.

बाराव्या वित्तआयोगातील महत्वाच्या शिफारशी

१. कर उत्पन्नाच्या वाटपासंबंधीच्या शिफारशी- ३०.५ टक्के कर उत्पन्न राज्य सरकारांना वाटणे, २५ टक्के उत्पन्नाचे वाटप लोकसंख्येच्या निकषावर केली, राज्याचे भौगोलिक क्षेत्र विचारात घेऊन १० टक्के वाटप,राज्य सरकारांना २००५-१० या कालावधीसाठी ६१३११२ कोटी रुपयांचे कर उत्पन्न मिळणार आहे.

२. राज्यांना दिली जाणारी अनुदाने: २००५-१० या कालावधीसाठी एकूण १४२६४० कोटी रुपयांचे अनुदान देण्यासबंधी शिफारस केली आहे.

३. नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी अर्थसाहाय्य

२००५-१० नुसार केंद्र - राज्य यासाठी ७५:२५ अश्या प्रमाणात निधी ठेवला आहे.

४. स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत -२००५-१० या कालावधीसाठी २५००० हजारांचा निधी दिला आहे. यानुसार २० टक्के नगरपालिकांना व ८० टक्के वाटा पंचायतींना देण्याचे ठरविण्यात आले.

५. सार्वजनिक वित्ताच्या पुनर्ररचनेबाबत - केंद्र व राज्यांनी २००९-१० पर्यंत जीडीपी गुणोत्तर १७.६ टक्के पर्यंत वाढवावे, केंद्र व राज्यांसाठी राजकोषीय तुटीचे लक्ष्य ३ टक्के एवढे निश्चित करण्यात आले.

६. प्रशासनाचा दर्जा सुधारणे आणि विशेष समस्या अनुदान - बाराव्या वित्त आयोगाने आसाम, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान व पश्चिम बंगाल या राज्यांना शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी १०१७१.६५ कोटी रु. देण्याची शिफरस केली आहे. तर बिहार, आसाम, झारखंड, मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तरांचल या राज्यांना आरोग्य सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी ५८८७.०८ कोटी रु. अनुदान देण्याची शिफारस केली आहे.

# केंद्र-राज्य वित्तीय संघर्ष निर्माण होण्याची कारणे

१. घटक राज्यांच्या वित्तीय समस्या
२. राज्यांच्या वाढत्य जबाबदा-या
३. घटकराज्यांचे पुरेशा प्रमाणात न वाढणारे उत्पन्न
४. राज्यांची अपुरी व अलवचिक साधनसामुग्री
५. शक्तीशाली केंद्र सरकार
६. राज्यांचा स्वायत्ततेचा प्रश्न
७. वित्त आयोगाचे घटते महत्व
८. प्रादेशिक असमतोल
९. वित्तीय वाटपांसंदर्भात राज्यांच्या तक्रारी

## प्रकरण आठवे

# राजकोषीय धोरण

राजकोषीय धोरण हे असे धोरण आहे की, ज्यामध्ये सरकार आपले उत्पन्न आणि खर्चाच्या सहाय्याने राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगारावर होणारे प्रतिकूल परिणाम टाळून अनुकूल परिणाम घडवून आणते.- आर्थर स्मिथ

आर्थिक कृतींची रचना व पातळीवर परिणाम करण्यासाठी सरकारी खर्चात व कररचनेत केलेले बदल म्हणजे वित्तीय अथवा राजकोषीय धोरण होय.- हॅने आणि जॉन्सन

पूर्ण रोजगार आणि किंमतपातळीचे स्थैर्य या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी कर आणि सार्वजनिक खर्चात करण्यात आलेला बदल म्हणजे राजकोषीय धोरण होय. - इफस्टीन

# राजकोषीय धोरणाची साधने

१. कर

२. सार्वजनिक खर्च

३.सार्वजनिक कर्ज

४. अर्थसंकल्प

## राजकोषीय धोरणाची उद्दिष्टये :

१. आर्थिक स्थैर्य

२. पूर्ण रोजगार

३. आर्थिक विकास

४. उत्पन्न वाटपातील विषमता कमी करणे

५. किंमतपातळीचे स्थैर्य

६. समतोल प्रादेशिक विकास

७. राहणीमान पातळीत वाढ करणे